जाहिरात दिनांक :०५/०४/२०२४
अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक :१९/०४/२०२४

# जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
# जाहिरात

जिल्हा न्यायालय बुलडाणा यांचे आस्थापनेवरील "सफाईगार" या पदाकरिता उमेदवारांची निवड यादी तयार करणेकरीता पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

उमेदवाराने जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाकपोच पत्राद्वारे (R.P.A.D.) किंवा शिघ्र डाकसेवा द्वारे (Speed post) “सफाईगार पदाकरीता अर्ज” असे लिफाफ्यावर लिहून “प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा” यांचे कडे दिनांक १९/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यन्त अथवा त्यापुर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत. स्वतः किंवा इतरामार्फत पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

दिनांक १९/०४/२०२४ नंतर आलेले अर्ज किंवा लिफाफ्यावर “सफाईगार पदाकरीता अर्ज” असे नमुद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची उमेदवाराने नोंद घ्यावी. पोष्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

**सफाईगार :-** सफाईगार पदांची संख्या ०१ (एक)

**सफाईगार पदाच्या पात्रतेकरीता अर्हता :-**

१) उमेदवार किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा.
२) शरीर प्रकृतीने सुदृढ असावा.
३) पदाचे समारुप काम करण्याची योग्यता असावी.
४) उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा :-**

जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेला उमेदवार १८ वर्षापेक्षा कमी वयाचा नसावा आणि साधारण प्रवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा. मागासवर्गीय असल्यास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा.

**वेतनश्रेणी :-**

वेतन संरचना रु. **एस-०१, १५०००-४७६००/-**

**उमेदवारांना सुचना :-**

१) जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्या त्या विभाग / कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेवूनच अर्ज करावा. उमेदवारांनी आपले अर्ज आपआपल्या विभाग / कार्यालय प्रमुखामार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.
२) उमेदवाराने त्याचे / तिचे अलिकडचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशा प्रकारे स्वाक्षरी करावी की, त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.

३) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जासोबत जन्मतारखेच्या आणि शैक्षणीक प्रमाणपत्राची, जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी) साक्षांकित प्रत, सफाई कामाचा पुर्वानुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र, महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र व ईतर विशेष आर्हता असल्यास त्याबाबातचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

४) उमेदवाराने स्वतःचा पत्ता लिहीलेले एक पोष्टाचे पाकीट अथवा रु.१०/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला व स्वतःचा पत्ता लिहीलेला लिफाफा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५) विहित नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज रद्द करण्यात येईल.

६) विहित तारखेपर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी केली जाईल व पात्र उमेदवारांना पुढील चाचण्यासाठी बोलवावयाच्या उमेदवारांची यादी अंतिम दिनांकाच्या १५ दिवसानंतर जिल्हा न्यायालयाच्या https://buldana.dcourts.gov.in या संकेतस्थळावर व जिल्हा न्यायालयाचे सुचना फलकावर प्रसिध्द केली जाईल. त्यासोबत पुढील चाचणी बद्दलचे वेळापत्रक प्रसिध्द केले जाईल.

७) निवड समिती समान निकष लावून अनुभव / अर्हता / पदासाठी योग्यता याचा विचार करुन व उमेदवार निवडीसाठी योग्य त्या प्रकारच्या चाचण्या व मौखिक परिक्षा घेऊन उमेदवाराची निवड केली जाईल. याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

८) उमेदवारांना चाचण्या व मुलाखतीस बोलविल्यास स्वतःच्या खर्चाने हजर रहावे लागेल.

९) उमेदवाराने मुलाखतीस उपस्थित होतेवेळी मुळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकीत प्रती आणि दोन सन्माननीय व्यक्तिंनी दिलेले चारित्र्याचे दाखले सादर करावेत. तसेच उमेदवाराने ओळखपत्र जसे आधारकार्ड, पॅन कार्ड, वाहन चालविण्याचा परवाना ईत्यादी सोबत आणावे.

१०) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ नुसार उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमध्ये हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक नसावी.

११) उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वतः किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिकाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल. या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२) उमेदवाराला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरविले नसावे किंवा उमेदवाराचे विरुध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

१३) ही जाहिरात जिल्हा न्यायालयाच्या https://buldana.dcourts.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

स्वा/-(एस.जी.जाधव)
प्रभारी प्रबंधक
जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

# अर्जाचा नमुना

## जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा

## "सफाईगार" या पदाकरीता अर्ज

(टिप : अर्ज भरण्यापुर्वी जाहीरातीमध्ये दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचा)

| |
|---|
| नुकतेच काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) स्वाक्षरीसहीत |

प्रति,

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा- ४४३ ००१.

विषय: "सफाईगार" या पदाकरीता अर्ज.

महोदय,

मी विनंतीपुर्वक अर्ज सादर करतो / करते की, मी "सफाईगार" या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास ईच्छुक असुन माझी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संपूर्ण नाव : श्री/श्रीमती/कुमारी (आडनाव प्रथम) | -- ------------------------------------------------ ------------------------------------------------ |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सह) | -- ------------------------------------------------ ------------------------------------------------ ------------------------------------------------ |
| ३ | कायमस्वरुपी संपूर्ण पत्ता (पिनकोड सह) | -- ------------------------------------------------ ------------------------------------------------ ------------------------------------------------ |
| ४ | राष्ट्रीयत्व | |
| ५ | अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? | होय / नाही |
| ६ | दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | ई-मेल आय-डी (असल्यास) | |
| ८ | लिंग : | |
| ९ | जात व प्रवर्ग | |
| १० | जन्मदिनांक | दिनांक - - - - महिना - - - - वर्ष - - - - |
| ११ | जाहिरातीच्या तारखेस अर्जदाराचे वय | वर्षे - - - - महिने - - - - दिवस - - - - |
| १२ | उमेदवार विवाहित आहे काय ? | होय / नाही |

| | | |
|---|---|---|
| १३ | हयात असल्यास मुलांची संख्या | |
| १४ | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या | |
| १५ | अर्जदार न्यायालयीन कर्मचारी आहे काय ? असल्यास न्यायालयाचे नाव पदनाम | होय / नाही<br>------------------------------ |
| १६ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास कार्यालयाचे नाव व नेमणूकीची तारीख | |
| १७ | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास, अर्जदार योग्य मार्गाने अर्ज सादर करत आहे का ? | होय / नाही |
| १८ | उमेदवार दिव्यांग आहे काय ? | होय / नाही<br>(असल्यास तसा दाखल जोडावा) |

१९. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | परीक्षा मंडळाचे नांव | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| ६ | | | | | | |
| ७ | | | | | | |

२०. अनुभव :

| अ.क्र. | अनुभव (संबंधित काम केलेल्या ठिकाणाचे / कार्यालयाचे नाव व पत्ता) | कालावधी | | एकूण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासुन | दिनांकापर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

२१. इतर विशेष अर्हता : ------------------------------------------------

२२. अ. उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का ? (असल्यास माहिती जोडावी) : होय / नाही

ब. त्याला / तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले आहे का ? : होय / नाही

क. तो / ती शिस्तभंगाच्या चौकशीला सामोरे जात आहे का ? : होय / नाही

मी याद्वारे प्रमाणित करतो / करते की, माझ्या माहितीप्रमाणे वरील तपशील सत्य आणि अचूक आहे. यातील कोणतीही माहिती चूक/खोटी आढळल्यास मी निवड प्रक्रियेसाठी अपात्र ठरेन आणि माझी निवड / नेमणूक झाल्यास माझी सेवा कोणतीही नोटीस न देता संपुष्टात करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : / /

------------------------------

उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे-

१. ------------------------------------ २. ------------------------------------

३. ------------------------------------ ४. ------------------------------------

५. ------------------------------------ ६. ------------------------------------

७. ------------------------------------ ८. ------------------------------------

९. ------------------------------------ १०. ------------------------------------